# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आता फक्त दोन दिवस उरले आहेत. सर्व राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आम आदमी पार्टी, भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस पक्ष आपापल्या उमेदवारांना पाठिंबा मिळवण्यासाठी एकामागून प्रचारसभा घेत आहेत. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दुपारी आरके पुरम येथे एका जाहीर सभेला संबोधित करतील. पक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह राजेंद्र नगर, चांदणी चौक आणि लक्ष्मी नगर येथील सभांना उपस्थित राहतील. आम आदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ दिल्लीत एक प्रचारफेरी काढणार आहेत. पक्षाचे ज्येष्ठ नेते संजय सिंह हे दिल्लीतील अनेक भागात जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे मुस्तफाबाद परिसरात एका जाहीर सभेला संबोधित करतील. पक्षाचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी हेही राष्ट्रीय राजधानीत सभा घेणार आहेत.

दरम्यान, ७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीसाठी बुधवारी मतदान होणार असून ८ तारखेला मतमोजणी होणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या त्र्यंबकेश्वर इथून गुजरातमधील द्वारका इथं यात्रेकरूंना घेऊन जाणारी एक खाजगी बस आज डांग जिल्ह्यातल्या सापुतारा घाटातील खोल दरीत कोसळली. या अपघातात दोन महिला आणि तीन पुरुषांसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर १७ जण गंभीर जखमी झाले आहेत. शिर्डी, त्र्यंबकेश्वर इथं  दर्शन घेऊन काल रात्री नाशिक हुन बसने यात्रेकरू निघाले होते. चालकाचं नियंत्रण सुटल्यानं बस कठडा तोडून खोल दरीत कोसळली. या अपघातातील जखमींवर अहवा

इथल्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बस मधले यात्रेकरू मध्यप्रदेशातील गुना, शिवपुरी आणि अशोकनगर जिल्ह्यातले आहेत, असं याबाबच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मालाची विक्री अधिक पारदर्शक आणि शेतकऱ्यांच्या हिताची होण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीनं ई–नाम योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातल्या सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ई–लिलाव पद्धतीनं शेतमाल विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आतापर्यंत सुमारे ३० हजार शेतकऱ्यांनी ई–नाम प्रणालीवर नोंदणी केली आहे. २०२४ या वर्षाअखेर जवळजवळ ३५ लाख क्विंटल शेतमालाची विक्री झाली आहे. यातून सुमारे तेराशे कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल झाली असून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होत आहे. शेतकऱ्यांनी हमीभाव आणि बाजारभावासाठी नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ई–नाम प्रणालीवर नोंदणी करुन जास्त भाव देणाऱ्या व्यापाऱ्याकडे शेतमाल विक्री करावा, असं आवाहन सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केलं आहे.

****

मुंबई इथं काल पार पडलेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळ –बीसीसीआयच्या नमन पुरस्कार सोहळ्यात प्रसिद्ध  माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांना कर्नल सी.के. नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. दोन दशकांहून अधिक काळ भारतीय क्रिकेटमध्ये दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी सचिन यांना सन्मानित केलं. भारताचा गोलंदाज जसप्रीत बुमराह याला २०२४ मधल्या त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून पॉली उम्रीगर पुरस्कार देण्यात आला. भारतीय महिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधनानं चौथ्यांदा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूचा पुरस्कार जिंकला. बीसीसीआयनं यावेळी अंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून नुकतीचं निवृत्ती घेतलेल्या आर. अश्विनचाही सत्कार केला.

****

महिलांच्या १९ वर्षांखालील टी–२० विश्वचषकाचा अंतिम सामना आज भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात सुरु आहे. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं होत असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकुन दक्षिण अफ्रिका संघानं प्रथम फलंदाजीचा

निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण अफ्रिकन संघानं १३ षटकात ५ खेळाडूंच्या बदल्यात ४५ धावा केल्या आहेत.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी–२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज संध्याकाळी मुंबईत खेळला जाणार आहे. या मालिकेत भारताने ३–१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. दरम्यान, टी–२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना पाच फेब्रुवारी, दुसरा नऊ फेब्रुवारी आणि तिसरा बारा फेब्रुवारी रोजी होणार आहे.

****

नेदरलँडमध्ये काल झालेल्या टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदाने सर्बियाच्या अलेक्सी श्नाचा पराभव केला तर विश्वविजेत्या डि. गुकेशला नेदरलँडच्या जॉर्डी व्हॅन फॉरेस्टने बरोबरीत रोखले.

१२ व्या आणि शेवटच्या फेरीनंतर प्रज्ञानंदाने सलग तिसरा विजय मिळवत ८ पुर्णांक ५ गुण मिळवले. ११ व्या फेरीत गुकेश प्रज्ञानंद आणि उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तारोव्ह यांच्यापेक्षा अर्ध्या गुणांनी आघाडीवर होता, पण आता त्याचा सामना अनिर्णित राहील्यानंतर तो प्रज्ञानंदाच्या बरोबरीत आला आहे. दुसरीकडे, अब्दुसत्तारोव्हला भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगाईसीकडून पराभव पत्करावा लागला.

****